# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, परभणी

(गृह विभाग)

email-rdcparbhani@gmail.com Phone-02452-223702

## जाहिर आवाहन

नमस्कार............

भारतीय स्वातंत्र्याच्या 73 व्या वर्धापन दिनोत्सवानिमित्त जिल्ह्यातील सर्व सन्माननीय जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी यांना हार्दीक शुभेच्छा......

जिल्ह्यातील सर्व सन्माननीय जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यामधील योगदान अतुलनीय आहे. त्यांचे बलीदान व त्यागामुळेच भारत पारतंत्र्यातुन मुक्त झाला आहे.

आपणा सर्वांना विदीतच आहे की, सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशातंर्गत करोना विषाणू संसर्ग बाधीत रुग्ण वाढत आहेत. परभणी जिल्ह्यातही करोना (कोविड 19) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्ह्यात करोना या संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावाने व्यक्ती बाधीत होऊ नये, यासाठी जिल्ह्यात विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या महिन्याच्या 15 तारखेस आपण सर्व भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहोत. 15 ऑगस्ट या स्वातंत्र्य दिनी आपण सर्व सन्माननीय स्वातंत्र्य सेनानी सादर निमंत्रीत आहात. परंतु जिल्ह्यातील करोना या संसर्गजन्य आजाराची परिस्थिती लक्षात घेता व आपले वयोमान लक्षात घेता आपण सर्वांनी 15 ऑगस्ट हा भारतीय स्वातंत्र्य दिन आपल्या घरी राहून फेसबुकच्या लाईव्ह (Facebook Live) माध्यमातुन सहभाग नोंदविणे अधिक उचित राहील.

तथापि जिल्ह्यातील सन्माननीय स्वातंत्र्य सेनानी सदर कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास त्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे स्वागत आहे. त्यांनी करोना (कोव्हीड 19) संसर्ग प्रतिबंधात्मक दिलेल्या सूचनांचे / निर्देशांचे पालन करुन उपस्थित राहावे, असे मी नम्रपणे आवाहन करित आहे.

DISTRICT MAGISTRATE PARBHANI

—स्वाक्षरीत—

(दी.म.मुगळीकर भा.प्र.से.)

जिल्हादंडाधिकारी परभणी.

प्रतिलीपी,

1) जिल्हा माहिती अधिकारी परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त जाहिर आवाहनास स्वातंत्र्य दिनापुर्वी प्रमुख व स्थानिक वर्तमानपत्रातून जनहितार्थ विनामुल्य व्यापक स्वरुपात प्रसिध्दी द्यावी.

2) DIO, NIC परभणी व जिल्हा माहिती अधिकारी परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापन सोहळयाचे Live Facebook च्या माध्यमातून प्रसारण करणेबाबत कार्यवाही करावी.

(दी.म.मुगळीकर भा.प्र.से.)

जिल्हादंडाधिकारी परभणी.